# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P)२३३४७६९(O)Fax-२३५६८२०

http://www.dteau.orgEmail-roaurangabad.dte@gmail.com


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१७/२४८३

दिनांक :- 04 JUL 2017

प्रति,

**प्राचार्य,**

पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था

औरंगाबाद

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून राज्यात व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील पदविका अभ्यासक्रम बंद करणेबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी द्रिल्ली यांचेकडे प्रलंबित दर्शविण्यात आलेल्या प्रस्तावांबाबत..**

संदर्भ :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१०//एनजीपी/एआयसीटीई//२०१७-१८/प्रतंबित/३५१४ दिनांक १६/०६/२०१७

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची जाहिरात क्रमांक अप्रुव्हल/१२(११)/२०१६

३. संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक १०/एनजीपी/एआयसीटीई/२०१-१८/ना-हरकत/३०१५, दिनांक १३/०६/२०१७

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत संदर्भाधीन क्रमांक १ वरील जाहिरातीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता पदविका अभ्याक्रमांच्या सध्या सुरू असलेल्या पदविका संस्थेमधील सुरू असलेले पदविका अभ्यासक्रम बंद करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे, संस्थेच्या नावात,ट्रस्टच्या नावात, अभ्यासक्रमाच्या नावात बदल, पत्यात बदल, महिलांसाठी असलेली संस्था,सह शैक्षणिक संस्थेत रुपांतरीत करणे पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेचे पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपांतर करणे इ.बाबत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थाकडून ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्याबाबत संचालनायामार्फत कळविण्यात आलेले होत.

या पत्रान्वये खालील (डी.टी.ई. कोड) असलेल्या संस्था प्रमुख यांना कळविण्यात येते की, संस्थांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्याकडे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांनी पदविका अभ्यासक्रम बंद करण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावा मध्ये संस्थांच्या नावा समोर प्रलंबित (Pending) असे अभिप्राय नमूद करण्यात आले आहे. सदर प्रस्तावामध्ये काही त्रुटी असल्यास अथवा संबंधित संस्थांनी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे ना-हरकत प्रमाणपत्र, शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र (संदर्भ क्र.२ वरील संचालनायाच्या परिपत्रकात नमूद विहित कागदपत्रासह तंत्रशिक्षण संचालनालयाकडे अर्ज करणे आवश्यक आहे) संस्थेचा ठराव हमीपत्र इ.कागदपत्र त्याची तात्काळ पुर्तता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे/संचालनालयाकडे/मंडळाकडे तात्काळ करण्यात यावी. अन्यथा संबंधीत संस्थांच्या/अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीताच्या प्रवेशप्रक्रियेत काही अडचण निर्माण झाल्यास त्याची पुर्ण जबाबदारी संबंधीत संस्थांची राहील असे संदर्भिय पत्रात नमुद करण्यात आले आहे.

**डीटीई संस्था कोड-२१७४,२१८४,२१८५,२२९३,२२९४,२५०८,२५४०,**

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

Institute Later 2017-18